**दिनांक: १/१०/२४**

## विषय : पत्रकार नगर सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पा अंतर्गत सुधारित डिझाईन चे सादरीकरण.

दिनांक २९/९/२४ रोजी आपल्या सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पा चे बिल्डर आणि आर्किटेक्ट यांनी सोसायटी च्या पुरत्या डिझाईन (Overall View), फ्लॅट्स आणि डुप्लेक्स च्या आंतरिक रचना, येणाऱ्या दोन्ही टॉवर्स मधील फ्लॅट्स ची विभागणी, समाज मंदिर, पार्किंग आणि एमिनिटीज इत्यादी चे सादरीकरण मूनोत सभागृहात केले. ह्या सादरीकरणाला संस्थे चे एकूण १७३ सभासद आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

ह्या पूर्वी झालेल्या ९० फ्लॅट्स च्या तसेच डुप्लेक्स इमारतींच्या सादरीकरणा नंतर बऱ्याच सभासदांनी काही सूचना आणि प्रश्न उपस्थित केले होते त्या सर्वांचा योग्य तो विचार करून २९ तारखे चे सादरीकरण करीत असल्याचे बिल्डर कडून सांगण्यात आले होते.
सादरीकरणा नंतर सभासदांनी त्यांना असलेल्या शंका आणि काही सूचना मांडल्या ज्याला बिल्डर पेकी श्री माहेश्र्वरी यांनी उत्तरं दिली.

काही सभासदांचे म्हणणे होते की पहिल्या सादरीकरणात त्यांच्या फ्लॅट ची जी लोकेशन दाखविण्यात आली होती अगर त्यात त्यांना जो व्ह्यू मिळत होता तो आता नवीन आणि फायनल असलेल्या ड्रॉइंग मधे नाही. ह्या वर खुलासा करताना पंच समिती सदस्य श्री नेवाळकर यांनी सांगितले की आपल्या सोसायटी पुरते पहिले फक्त ९० फ्लॅट्स आणि १२ डुप्लेक्स होते मात्र ३४ स्प्लिट फ्लॅट्स ची मागणी झाल्याने संभावित इमारतींचे पुरते orientation बदलले आहे आणि त्या मुळे हे changes करावे लागले आहेत.

हे सादरीकरण आपले बाहेर गावी आणि परदेशी असलेले सभासद ही बघू शकतील त्या साठी एक लाइव्ह लिंक देण्यात आली होती ज्याचा उपयोग १४ हून अधिक सभासदांनी केला.

श्री नेवाळकर यांनी बिल्डर फर्म चे उपस्थित डायरेक्टर, अधिकारी, आर्किटेक्ट श्री प्रमोद दुबे आणि सर्व उपस्थितांचे आभार मानून आणि सर्वांना जेवणासाठी आमंत्रित करून सादरीकरण संपल्याचीची घोषणा केली.

पंच समिती